अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

खास सभा

नोटीस.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र. १ ( ह ) अन्वये.)

अहमदनगर महानगरपालिका कार्यालय.

दिनांक : १६-१०-२००६.

श्री./ श्रीमती........................................
सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका.

यांस -

याद्वारे कळविण्यांत येते की,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र.१ ( ह ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा शुक्रवार दिनांक २०-१०-२००६ रोजी दुपारी १-०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १. विषय पत्रिका व टिप्पणी.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

शुक्रवार  दिनांक २०-१०-२००६ रोजी दुपारी  १=०० वाजता महानगरपालिका सभागृहात होणां-या खास सभेपुढील विषय पत्रिका.

--*--

१. अहमदनगर शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून सन २०३१ अखेरपर्यंत तयार केलेला शहर विकास आराखडा प्रस्ताव (UIDSSMT) मंजुरीसाठी मा.स्थायी समिती सदस्य १.मा.श्री.शेख मुद्दस्सर अहमद इसहाक २.मा.श्री.भाउसाहेब उडाणशिवे ३.मा.श्री.सुनिल त्रिपाठी  ४.मा.श्री.पोपटराव बारस्कर यांची विशेष सभा बोलविण्याबाबतची यादी व आफीस रिपोर्ट.

२. मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक १६-१०-२००६

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

कृपया टिप्पणी मागे पहा...

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

शुक्रवार  दिनांक २०-१०-२००६ रोजी दुपारी  १=०० वाजता महानगरपालिका सभागृहात होणां-या

खास सभेपुढील विषया बाबतची टिप्पणी.

--*--

| अ.नं. | विषय | टिप्पणी |
|---|---|---|
| १ | अहमदनगर शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून सन २०३१ अखेरपर्यंत तयार केलेला शहर विकास आराखडा प्रस्ताव (UIDSSMT)मंजुरीसाठी मा.स्थायी समिती सदस्य १.मा.श्री.शेख मुद्दस्सर अहमद इसहाक २.मा.श्री.भाउसाहेब उडाणशिवे ३.मा.श्री.सुनिल त्रिपाठी  ४.मा.श्री.पोपटराव बारस्कर यांची विशेष सभा बोलविण्याबाबतची यादी व आफीस रिपोर्ट. | ऑफिस रिपोर्ट मंजूर करणेस शिफारस आहे. |
| २ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. | टिप्पणी नाही. |

दिनांक : १६-१०-२००६.
अहमदनगर.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १ दि.२०-१०-२००६.

**प्रस्तावाचा विषय** - अहमदनगर शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून सन २०३१ अखेरपर्यंत तयार केलेला शहर विकास आराखडा प्रस्ताव (UIDSSMT) मंजुरीसाठी मा.स्थायी समिती सदस्य १.मा.श्री.शेख मुद्यस्सर अहमद इसहाक २.मा.श्री.भाउसाहेब उडाणशिवे ३.मा.श्री.सुनिल त्रिपाठी ४.मा.श्री.पोपटराव बारस्कर यांची विशेष सभा बोलविण्याबाबतची यादी व आफीस रिपोर्ट.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : भारत सरकारने २००५ सालापासून लहान व मध्यम शहरांसाठी पायाभुत सुविधांमध्ये विकास करण्याची योजना सुरु केलेली आहे.पुढील २५ वर्षामध्ये (Urban Infrastructure development Scheme for Small & medium Town i.e. UIDSSMT))

या योजनेमध्ये खालील कामे घेता येणे शक्य आहे.

१.नागरी नुतनीकरण

२.पाणी पुरवठा

३.मलनिस्सारण व घन कचरा व्यवस्थापन

४.पावसाच्या पाण्यासाठी गटर्स बांधणे व अस्तित्वातील गटारीची सुधारणा करणे

५.रस्त्यांची बांधणी व सुधारणा करणे

६.वाहन तळाची सुविधा सार्वजनिक किंवा खाजगी करणाच्या तत्वावर पुरविणे

७.ऐतिहासिक स्थळांची सुधारणा करणे

८.ज्या राज्यांमध्ये भुस्तर किंवा कडे कोसळण्याची शक्यता असते त्या ठिकाणी प्रतिबंधात्मक किंवा पुनर्वसनाची योजना

९.पाण्याचे साठे टिकविणे व राखणे

परंतू निर्देशीत केल्याप्रमाणे यामध्ये खालील कामे घेता येणे शक्य नाही

१.उर्जा व इतर तत्सम व्यवस्था

२.परिवहन व्यवस्था

३.आरोग्य व शिक्षण विषयक संस्था

४.नागरी वाहतूक

५.नियुक्तीच्या मोबदल्या संदर्भातील  कार्यक्रम किंवा व्यवस्थापनातील सेवा घटक

६.देखभाल व दुरुस्ती

सदर काम महाराष्ट्र राज्य शासनामार्फत भारत सरकारकडे मंजुरीसाठी सादर करणे आहे.त्या मंजुरीसाठी सदर विषय सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात येत आहे.

या योजनेमध्ये अनुदानाचे वाटप खालीलप्रमाणे होणार आहे.

| | |
|---|---|
| १.भारत सरकार | ८०% |
| २.महाराष्ट्र शासन | १०% |
| ३.महानगरपालिका | १०% |

महानगर पालिकेचा हिस्सा स्वतःच्या निधीतून किंवा कर्जाच्या व अन्य माध्यमामधुन उभारणे शक्य आहे.

सदर शहर विकास आराखडा तयार करण्यासाठी जाहिर निवीदा मागवून मुंबई येथील हिन्कॉन टेक्नो कन्सल्ट प्रा.लि या संस्थेची  नेमणूक करण्यात आली. मा.आयुक्त साहेब यांचे मार्गदर्शनाखाली अहमदनगर शहरातील गणमान्य व्यक्तींच्या बैठका घेण्यात आल्या.त्यामध्ये पत्रकार,डॉक्टर्स ,आर्किटेक्सस व इंजिनिअर यांच्या वेगवेगळया गटांमध्ये व वेगवेगळया दिनांकाना बैठका घेण्यात आल्या.त्याचप्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्व सन्माननिय सदस्यांची दिनांक १६/९/२००६ रोजी सुचना प्राप्त करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली.त्यानंतर बांधकाम खात्यामार्फत पत्रे लिहून दिनांक २५/९/२००६ पर्यंत सन्माननिय सदस्यांची मते मागविण्यात आली." हिन्कॉन " चे प्रतिनिधी यांनी दिनांक १०/१०/२००६ ते १२/१०/२००६ पर्यंत सन्माननिय सदस्यांची भेट घेवून मते आजमाविली.

सदर आराखडा तयार करतांना अहमदनगर महानगरपालिका हद्यीतील अस्तित्वातील पायाभुत सुविधांचा जसे ऐतिहासिक व भौगोलिक स्थान,पाणी पुरवठा,रस्ते ,मलनिस्सारण,पावसाच्या पाण्याच्या  निचरा,घनकचरा व्यवस्थापन,अग्निशमन व्यवस्थापन, विद्युतीकरण , शहर परिवहन ,नागरी पर्यावरण आणि दिनदुबळे व दलीतांसाठीची व्यवस्था या सर्व बाबींचा विचार करण्यात आला.या पाहणीमध्ये अहमदनगर शहराची शक्तीस्थाने,कमतरता ,संधी व भविष्यातील धोका या बाबींची शक्यता अजमाविण्यात

आली.त्याचप्रमाणे एम.आय.डी.सी ,पुणे व औरंगाबाद जिल्हयांना मध्यवर्ती असणे,अहमदनगरचा ऐतिहासिक किल्ला,शहराचे महत्व,रेल्वे स्टेशन ही शक्तीस्थाने आहेत तर अत्यंत कमी दाबाचा पाणी पुरवठा ,निकृष्ठ मलनिस्सारण,सार्वजनिक परिवहन व्यवस्था नसणे,रेल्वेचे अपुरे जाळे ही कमतरता रस्त्यांच्या असुविधेसह आढळून आली.अहमदनगर शहरामधून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २२२ महानगरपालिका निकटवर्तीय जिल्हयांसाठी पर्याय,पर्यटनास चालना व उपनगरांची सुनियोजित वाढ करणे शक्य आहे या भविष्यातील संधी आहेत.सर्वात धोकेदायक गोष्टी म्हणजे दुरवरुन केला जाणारा पाणी पुरवठा ,पायाभुत सुविधामधील अडचणी,निकटवर्तीय जिल्हयांशी जसे पुणे,औरंगाबाद स्पर्धा आणि कालानुरुप वाढत्या स्वरुपातील वाहतुक व लोकसंख्या या आहेत.शहराचे एकंदरीत ३ भाग पाडून विचार करण्यात आला १.गावठाण २.या बाहेरचा भाग ३.हद्यवाढीतील १२ गावे प्रत्येक ठिकाणच्या अडीअडचणींच्या साधक बाधक विचार करण्यात आला.शहरामधुन जाणारी सीना नदी ,वातावरण पर्जन्यमान इत्यादी बाबींचा देखील विचार करण्यात आलेला आहे.लोकसंख्या वाढ प्रामुख्यांने विचारात घेण्यात आली आहे.अहमदनगर शहराची औरंगाबाद व पुणे शहरांशी तुलना केली असता वाढीचा दर तुलनात्मक दृष्टया जास्त आढळला हे चित्र आशादायक आहे.औद्योगिक कामगार हा देखील महत्वाचा घटक आढळलेला आहे.अहमदनगर शहराभोवती असणारी संरक्षण खात्याची जमीन शहराच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाची आहे.

एकंदरीत शहर विकास आराखडयाचे खालील प्रमाणे भाग करणे शक्य आहे.

१.पाणी पुरवठा

पाणी पुरवठा हा शहरापासून ४० कि.मी लांब असलेल्या मुळा धरणातून होतो.सर्व पाईपलाईन सुमारे ४० वर्षापुर्वी टाकलेली असून (जुने शहर व मुळा धरणापासूनच्या ) त्या सर्वांच्या सर्वच्या सर्व बदलणे आवश्यक आहे.निकषाप्रमाणे प्रत्येक व्यक्तीमागे १३५ लिटर्स प्रत्येक दिवशी पाणी मिळणे आवश्यक आहे.परंतू एकूण ६२ एम.एल.डी पाणी पुरवठयापैकी फक्त ५६.८ एम.एल.डी इतकेच पाणी प्रत्यक्षात ग्राहकांपर्यंत पोहोचते.वाटेमध्ये पाण्याची हानी होते.( Transit loss ) त्याचप्रमाणे अनाधिकृत व नळ जोडण्यादेखील एक महत्वचाचे कारण ठरु शकते.शहरामध्ये नळांवर मोटारी लावण्याचे प्रमाणदेखील लक्षणीय आहे.या सर्व कारणामुळे फक्त १०० लिटर्स प्रती माणसी / प्रती दिवस पाणी उपलब्ध होते.व त्यात सुधारणा करणेसाठी सर्वच्या सर्व पाईपलाईन व इतर अनुषंगीक बाबींमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

२.मलनिस्सारण

शहराची परिस्थिती अशी आहे की, फक्त ४२ टक्के लोकांनाच बंद गटर्सची तरतूद आहे.२५% लोक उघडया गटारीचा वापर करतात तर ३३ टक्के लोकांना कोणतीच योजना उपलब्ध नाही.आरोग्याच्या दृष्टीने सदरची बाब अतिशय विदारक अशी आहे.फर्याबाग येथे बांधलेला (S T P ) मलनिस्सारण प्रकल्प गेल्या १५ वर्षापासून विनावापर पडून आहे व केडगांव,मुंकुंदनगर,सावेडी तसेच हद्यवाढीतील गावांमध्ये कोणतीही सोय नाही.सदर बाब अत्यंत धोकादायक असून या बाबींचे विसर्जन जवळच्या नाल्यामध्ये तसेच सीना नदीमध्ये होते यादृष्टीने मोठया प्रमाणावर तरतूद करण्याची तातडीची आवश्यकता निर्माण झाली आहे.पावसाच्या पाण्याच्या बाबतीतही अशीच परिस्थिती आहे.त्यामुळे १ तासाच्या मुसळधार पावसात देखील शहर जलमय होते व ठिकठिकाणी सखल भागांमध्ये तसेच रस्त्यांवर पाणी साठून नागरीकांची मोठया प्रमाणावर गैरसोय होते.बागरोजा हडको परिसर ,जाधव मळा,धर्माधिकारी मळा, लेखानगर, वेदांतनगर,पाईपलाईन रोडच्या पलीकडील भाग हा या कारणाने त्रस्त असतो.यासाठी देखील मोठया प्रमाणावर तरतूद करणे हे अत्यंत आवश्यक आहे.

३. घनकचरा व्यवस्थापन

नागरी सुविधाच्या मध्ये हा अत्यंत महत्वाचा घटक आहे.अहमदनगर शहरामध्ये एकूण अधिकृत ७२ हजार घरे असून त्यातील ६५४३० घरामधील कचरा गोळा केला जातो.कच-याचे एकूण प्रमाण खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १.वैद्यकीय कचरा | -- | १३.०५ टन |
| २.इतर कचरा | -- | ७६ टन |
| ३. गोळा केला जाणारा कचरा | -- | ६५ टन |

सदर कचरा सफाई कामगार घंटागाडया,डस्टबीन या माध्यमातून गोळा केला जातो.यामध्ये अतिरिक्त गाडया घेणे आवश्यक आहे.

बुरुडगांव रोडला २० एकर कचरा डेपोची जागा असून याठिकाणी शहरातील कचरा आणला जातो.वैद्यकीय कचरा प्रक्रिया करण्यासाठी खाजगीकरणाअंतर्गत काम सुरु आहे.

परंतू ही व्यवस्था अपुरी असून यामध्ये सुधारणा करणे मोठया प्रमाणावर अपेक्षीत आहे.या ठिकाणी आरोग्यदायक वातावरण ठेवणे आवश्यक आहे.यासाठी डम्पींगची सोय ,वैद्यकीय कचरा

विल्हेवाट, रस्ते, पाणी, विद्युतीकरणाच्या सोयी पुरविणे आवश्यक आहे.शासकीय दृष्टया सर्व व्यवसथा करण्याच्या तरतूदी आराखडयात करण्यात आलेल्याआहेत.

४. अग्निशमन व्यवस्था

आपत्ती ही सांगून येत नसते.हे गृहीत धरुन अग्निशमन व्यवस्था सुधारणे आवश्यक आहे याठिकाणी ५१ कर्मचा-यांची नियुक्ती केलेली असून हद्यवाढीचा भाग ,मुंकुदनगर,केडगांव या भागासाठी अतिरिक्त व्यवस्था करणे आवश्यक आहे.सावेडी साठी एक व शहरासाठी २ अशी फक्त ३ वाहने असून ती निकषाप्रमाणे वाढविणे आवश्यक आहे.गेल्या ५ वर्षातील आगीचे प्रमाण पहाता तसेच मानकाप्रमाणे १ अग्निशमन केंद्र व २ अतिरिक्त वाहने (१ लाख लोकांसाठी एक केंद्र व प्रत्येक केंद्रामागे २ वाहने ) वाढविणे आवश्यक आहे.जुन्या गावातील चिंचोळे रस्ते व केडगांव मुंकुंदनगर हद्यवाढीतील लांबवरची गावे या बाबींचा विचार आराखडा तयार करतांना केलेला आहे.

५.विदयुतीकरण

पुरेसा प्रकाश पुरविणेसाठी व सुरक्षितेसाठी तसेच सौदर्यीकरणासाठी याही पेक्षा जास्त प्रमाणात विदुयतीकरण आवश्यक आहे.परंतू महानगरपालिका यासाठी मोठया प्रमाणात खर्च करु शकणार नाही.व विदयुत मंडळ देखील महाराष्ट्राची विदयुत निर्मीतीची परिस्थिती पहाता एवढा विज पुरवठा करु शकणार नाही.यासाठी महाराष्ट्र शासनाच्या बचतीच्या सुचना असून महानगरपालिका त्याची अंमलबजावणी करीत आहे.परंतू महानगरपालिका पातळीवर स्वतःचा विजनिर्मीती प्रकल्प असणे आवश्यक आहे.यावर देखील आराखडयात भर देण्यात आलेला आहे.ही निर्मीती सौर किंवा पवन उर्जा या स्वरुपात गृहीत धरलेली आहे.रस्त्यांवरील लाईटची संख्या ५० नग १ किमी इतकी मानकाप्रमाणे आहे.परंतू प्रत्यक्षात सदर प्रमाण ३४ नग १ कि मी इतके आहे.सदर बाब व इतर सुधारणा आराखडयात गृहीत धरलेली आहे.

६.परिसरातील रस्ते व रेल्वे

अहमदनगर शहराच्या मध्यातून जाणारे महत्वाचे रस्ते जसे पुणे नगर औरंगाबाद मनमाड नगर, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २२२ याची सुधारणा जसे चौपदरीकरण ,रुंदीकरण इत्यादी कामे प्रगतीपथावर आहे.रेल्वेचा डबल लाईनचा प्रस्ताव तसेच कल्याण नगर परळी हा रेल्वे मार्ग देखील प्रस्तावीत असून नगर - परळी रस्त्यांचे काम प्रत्यक्षात सुरु आहे.याचा उपयोग भविष्यांत अहमदनगर शहराच्या विकासासाठी होणार आहे.याची नोंद आराखडयात औद्योगिक विकास तसेच पर्यटन या दृष्टीने घेण्यात आलेली आहे.

७.अहमदनगर शहरातील रस्ते

अहमदनगर महानगरपालिका हद्दीत एकूण ३९२ कि.मी.लांबीचे रस्ते आहेत.त्याची वर्गवारी खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १.डांबरी रस्ते | -- | २८५ कि.मी |
| २.सिमेंट कॉंक्रीट रस्ते | -- | २८ कि.मी |
| ३.कच्चे रस्ते | -- | ५० कि.मी |
| ४.खडीचे रस्ते | -- | २९ कि.मी |
| एकूण | -- | ३९२ कि.मी |

हे सर्व रस्ते अत्याधुनिक तंत्राने विकसीत करण्यावर भर दिलेला आहे.भविष्यांमध्ये रस्त्यांमध्ये वाढ गृहीत धरुन सुमारे ४५ कि.मी अतिरिक्त लांबी गृहीत धरणेत आलेली आहे.

जुन्या शहरातील वाहतुक व गर्दी पहाता कापड बाजार काही प्रमाणात उपनगरामध्ये नेण्याची आवश्यकता प्रतिपादन केलेली आहे.अतिक्रमण काढणे जसे चितळे रोड,घासगल्ली जुना कापड बाजार, गंज बाजार, इत्यादी रस्ते सुधारणे व नगररचनेत प्रस्तावीत केल्याप्रमाणे रुंद करणे संयुक्तीक ठरेल ठिकठिकाणी सिंग्नल्स बसविणे प्रस्तावीत आहे.रस्त्यांची निर्मीती तांत्रीक दृष्टया संकल्पीत करणे व निकष तसेच मानकांप्रमाणे सर्व रस्ते बांधणी प्रस्तावीत आहे.अपेक्षीत दर्जा असणारे सर्व रस्ते बांधणे विशेषतः हद्यवाढीतील गावामधील रस्ते विकसीत करणे.

८. पर्यटन

अहमदनगर शहरातील नियामत खान पॅलेस ,कोठला, मक्का मस्जीद,चंगेझखान पॅलेस,निजाम अहमदशहाची कबर इत्यादी ऐतिहासिक स्थळे विकसीत करणे प्रस्तावीत आहे.यामुळे शहराच्या सौदर्यात भर पडणार आहे.

९. दलीत वस्ती सुधारणा / झोपडपटटी

अहमदनगर शहरामध्ये एकंदर २२ झोपडपटटया असून त्यातील १७ घोषीत व ५ अघोषीमत आहेत.एकूण लोकसंख्येच्या १५% लोक झोपडपटटयांमध्ये रहात आहे.सदर क्षेत्रफळ ०.१८ चौ.कि.मी इतके असून एकूण लोकसंख्या ४६५०० इतकी आहे.या व्यतिरिक्त ५% पेक्षा जास्त अनुसुचीत जातीची लोकसंख्या अनेक ठिकाणी आहे.व या सर्व ठिकाणांची सुधारणा प्रस्तावीत आहे.या सर्व ठिकाणी स्वच्छता गृहे ,घनता कमी करणे,म्हणजे अन्यत्र निवासाची चांगली सोय करणे,आरोग्य व स्वच्छता राखणे इत्यादी बाबी अपेक्षीत आहे.

सदर आराखडयासाठी शासनाने खालील बाबींची पुर्तता करणेस आदेशीत केलेले आहे.

१.लेख्यांच्या बाबतीत दुहेरी नोंदी ठेवणे

२.वसुली ८५% इतकी वाढविणे

३.संगणकीकरण करणे

४.उपभोक्ता कर बसविणे

५.खर्चावर नियंत्रण

सर्व साधारण सभेमध्ये खालीलप्रमाणे कामे घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

१.४ महत्वाचे रस्ते

२.सावेडी भुयारी गटार योजना

३.घनकचरा व्यवस्थापन

या सर्वाचे तसेच आराखडयामध्ये प्रस्तावीत रकमेच्या कामांचे सविस्तर प्रकल्प अहवाल खाजगी संस्थामार्फत जाहिर निविदा मागवून करणे योग्य राहील.इतर महानगरपालिकेकडे चौकशी करता सविस्तर प्रकल्प अहवालाबाबत साधारणतः १.५० % ते १.७५% इतके दर निविदाधारकांनी दिलेले समजते.निविदेत व वाटाघाटी अंती यामध्ये बचत होण्याची शक्यता नाकारता येत नाही.सर्व साधारण सभेची वरील बाबीस मंजुरी आवश्यक आहे.

आराखडयामध्ये महानगरपालिकेच्या आर्थीक बाबीचा उहापोह करण्यात आलेला असून निधी उभारण्यासाठी महानगरपालिका निधी ,कर्ज उभारणे इत्यादी पर्याय खुले आहेत.येथून पुढे होणारे वार्षीक अंदाजपत्रके अत्यंत अभ्यासपुर्ण कामांच्या नावासह ,शिर्षासकट व शहर विकास आराखडयाच्या तरतुदीसह करावे लागणार आहे.विशेषता ८ माही अर्थसंकल्प अत्यंत बारकाईने व अभ्यास करुन तपासणी करणे आवश्यक आहे.सर्वसाधारण सभेचे या बाबीकडे विशेष करुन लक्ष वेधण्यात येत आहे.

एकूण आराखडयामध्ये ५ / ५ वर्षाचे टप्पे केलेले असून प्रत्येक वर्षा मध्ये करावयाच्या कामाचे स्वरुप सोबतच्या तक्तयांत दिलेले आहे.तांत्रीक ,भौगोलिक ,ऐतिहासिक,पर्यटन ,आर्थीक सद्यस्थिती ,भविष्यातील वाढ ,महानगरपालिकेची आर्थीक स्थिती ही स्थिती सुधारणेचे प्रयत्न ,शासनाचे आदेश, मानके व निकष या सर्व बाबींचा " शहर विकास आराखडा २०३१" तयार करतांना साधक बाधक विचार करण्यात आलेला आहे.अत्यंत परिपुर्ण व अहमदनगर शहराच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपुर्ण असा आराखडा तयार करण्याचा हा प्रयत्न आहे.

अहमदनगर शहराच्या विकासासाठी येथून मागे असे कोणतेही ठोस प्रयत्न झालेले नाही असे नमुद करावयाचे वाटते.भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या वरदहस्ताने अहमदनगर शहराची विकास गंगा वाहणार आहे.यासाठी प्रशासन व लोकनियुक्त पदाधिकारी यांना पराकोटीचे प्रयत्न करावे लागणार आहे.प्रशासनाचे अधिकारी तसेच पदाधिकारी यांना सदर आराखडा मंजुरीसाठी मुंबई व दिल्ली येथे मंत्रालयामध्ये पाठपुरावा करावा लागणार आहे.विशेष करुन शहर अभियंता यांना या बाबतीत विशेष अधिकार देवून खर्चास प्रशासकीय मान्यता सर्व साधारण सभेने देणे क्रमप्राप्त राहील.शहर अभियंता यांचेकडे तांत्रीक कर्मचारी अतिशय कमी आहे. सदर अभियंते भरण्याची परवानगी देण्यात यावी.तसेच चांगल्या प्रतीचे ४ चाकी वाहन उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

सोबत तक्ते व आरेखने अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

भांडवली गुंतवणुक योजना व टप्पे

| अ.नं. | योजना | गुंतवणुकीची रक्कम रु.कोटीमध्ये | २००७ते २०१२ | २०१२ ते २०१७ | २०१७ ते २०२२ | २०२२ ते २०२७ | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पाणी पुरवठा | ६६३ | २६१.८२ | ३२१.१८ | ८० | ० | सार्वजनिक व्यवस्थेसाठी रु.२० कोटी इ.तरतुद केलेली आहे. |
| २ | मलनिस्साःरण | १९९ | १६२ | १६ | २१ | ० | |
| ३ | ड्रेनेज | ६७ | ० | २२.४ | २२.३ | २२.३ | |
| ४ | घनकचरा व्यवस्थापन | ५६.८ | ९.८ | १२ | १४ | २१ | |
| ५ | अग्निशमन व्यवस्था | १५ | - | १५ | - | - | |
| ६ | शहर वाहतुक | ६०२.४ | २८७.४ | १३५ | ९० | ९० | |
| ७ | भुखंड सुधारणा | १४९ | ४० | ४३ | ३३ | ३३ | |
| ८ | नागरी पर्यावरण ( सीना नदी सुधारणा) | ४२ | २२ | २० | - | - | |
| ९ | दलीत वस्ती | १८० | ४५ | ४५ | ४५ | ४५ | |
| | एकुण | १७९४.२ | ७८३.०२ | ५८४.५८ | २६०.३ | १६६.३ | |

या सर्व खर्चामध्ये भाववाढ ,व्याज ,कर्ज केंद्र व राज्य शासनाची तरतूद तसेच महानगरपालिकेची तरतूद या गोष्टींचा विचार केलेला आहे.संस्थेच्या सुधारणेसाठी देखील यामध्ये तरतूद आहे.वेगवेगळया वॉकर्स ,आर्थीक संस्थाकडून कर्ज उभारले जावू शकते.

सरतेशेवटी सर्व साधारण सभेसमोर  सादर करावेसे वाटते की, शहरातील व जिल्यांतील सर्व सामाजिक व राजकीय क्षेत्रामधील गणमान्य यजमान्य तसेच मंत्री महोदय ,लोकसभा

सदस्य,विधानसभा सदस्य, विधानपरिषद सदस्य या सर्वांना विचार विनीमयासाठी मार्गदर्शनासाठी व भविष्यात होणा-या मदतीसाठी विशेष सर्व साधारण सभेत उपस्थित राहण्याचे विशेष आमंत्रण सन्मान पुर्वक देण्यास हरकत नाही. सर्व साधारण सभेच्या मंजुरीसाठी सविनय सादर.

यावर मा. उपायुक्त कर यांचा अभिप्राय की, प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवणे योग्य.

यावर मा.प्र.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यासाठी कार्यवाही त्वरीत करावी.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मा.महानगरपालिकेची विशेष सभा बोलाविणे बाबत मा.सदस्य ,स्थायी समिती यांचे पत्रानुसार त्वरीत सभा बोलवावी.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट श्री.कुलकर्णी,सिटी इंजिनिअर, मा.उपायुक्त कर व मा.आयुक्त साहेब व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

**चर्चा :** शेख नजिर अहमद रज्जाक उर्फ नज्जु पहिलवान : मी २० ते २५ वर्षापासुन नगरसेवक म्हणुन निवडुन येत आहे. पण आमच्या भागात आजपर्यंत रस्ते सुस्थितीत नाहीत. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. गोविंदपुरा बेपारी मोहल्ला या भागात पण रस्त्याची परिस्थिती अतिशय वाईट झाली आहे. रस्ते चांगले झाले पाहिजे.

श्री.संदिप कोतकर , महापौर : रस्त्याबाबत कमिटी बसवुन काम करून घ्यावे.

मा.सुनिल त्रिपाठी : शहर विकास आराखडयाबाबतचा विषय या सभेत आणल्याबद्यल प्रथम मी महापौर,उपमहापौर व आयुक्त साहेब यांचे मी आभार मानतो. आराखडा हा मोठा आहे.

एन.डी.कुलकर्णी , शहर अभियंता - सदरचा विषय हा तातडीने मंजुर करून शासनाकडे पाठविणे आवश्यक आहे. व शासनाकडुन सदरचा विषय मंजुर करून आणण्यासाठी आपणांस सर्वांना प्रयत्न करावे लागतील. बांधकाम विभागाकडे अभियंता यांची संख्या कमी आहे. किमान १० अभियंता यांची तातडीने नेमणुक करणे आवश्यक आहे. सदर आराखडयामध्ये इतर नामांकित इंजि.आर्किटेक्ट तसेच अनुभवी लोकांना समाविष्ट करून घेवुन त्यांचे सहकार्य घ्यावे लागेल. आराखडयाची कामे तातडीने करण्यासाठी अनेक ठिकाणी प्रवास करावा लागणार असल्याने अभियंत्यासाठी चांगल्या प्रतीची गाडी देणे आवश्यक आहे.

मा.त्रिपाठी : आराखडा तयार करणारे व त्यांना सहकार्य करणारे मनपाचे शहर अभियंता एन.डी.कुलकर्णी यांच्या अभिनंदनांचा ठराव मंजुर करावा.

मा.नामदेव पवार : त्रिपाठी यांनी सुचविलेल्या ठरावास माझे पुर्णतः अनुमोदन आहे.

मा.सहानी : गोवंदपुरा , फकिरवाडा या भागातील ड्रेनेजची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. ड्रेनेज रस्त्यावरून वाहते आहे. तातडीने कार्यवाही करण्यात यावी.

मा.संदिप कोतकर, महापौर : विषय पत्रिकेवरील विषयाचे विषयांतर न होता फक्त विषयावरच चर्चा करावी.

मा.नामदेव पवार : हा शहर विकास आराखडा हा अतिशय चांगला असुन भविष्यात तो नागरिकांच्या हीताचा आहे. पण सदर आराखडयासाठी पैशाची तरतुद कमी वाटते. शहराची वेगाने वाढणारी लोकसंख्या तसेच वाहनांची वाढणारी संख्या मोठया प्रमाणावर असल्याने त्यादृष्टीने रस्ते रूंद करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीकोनातुन आज विचार करण्याची आवश्यकता आहे. या विकास आराखडयामुळे नगर शहर सुधारेल अशी आशा आहे.

मंगल गुंदेचा : शहरात काही भागात सध्या अपुरा पाणी पुरवठा होत आहे. पाणी पुरवठयात सुधारणा व्हावी म्हणुन नविन पाईप लाईन टाकण्यात यावी. पाणी साठवणुक करणेसाठी शहरात नविन टाक्या बांधण्यात याव्यात. सदर कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सहकार्य घेण्यात यावे. आमच्या भागातही अपुरा पाणी पुरवठा होत आहे. काही ठिकाणी पाणी येते , काही ठिकाणी पाणी येत नाही. शहरातील रस्ते पक्के सिमेंट कॉंक्रिटचे करण्यात यावे. म्हणजे रस्ता दुरूस्तीवर खर्च कमी येईल. लाईटची व्यवस्था ही अंडरग्राउन्ड करण्यात यावी. डी.एस.पी.चौकातुन जाणारे रस्ते , चांदणी चौकातुन जाणारे रस्ते यावर डिव्हायडर टाकण्यात यावे. त्यामुळे अपघात कमी होतील. महाराष्ट्रातील अनेक शहरांना जुने नगर आण नविन नगर असे नांवे आहेत. तर आपल्या येथे होणा-या नविन शहरास नवनित नगर असे नांव देण्यात यावे.

अनंत जोशी : आराखडा यशस्वीपणे राबविण्यासाठी प्रशासन प्रयत्न करीत आहे. केंद्र सरकार ही विकासासाठी वेळोवेळी नवनविन योजना आणत असते. केंद्र सरकारने आय.यु.डी.पी., आय.डी.एस.एम.टी, यु.आय.डी.एस.एस.एम.टी. यांसारख्या विकसनशिल योजना आणलेल्या आहेत. या योजना राबवितांना वेळोवेळी सर्व्हे केलेला आहे. त्याचाही उपयोग हा विकास आराखडा राबवितांना करण्यात यावा. उपलब्ध निधीतुन कामे करतांना निधीचे शहरातील सर्व भागांना समान

वाटप करण्यात यावे. पाणी कमरतता दुर करण्यासाठी नविन टाक्या बांधण्यात येवुन सर्व भागांना समान पाणी वाटप करण्यात यावे. सावेडी भागातील ड्रेनेज योजना त्वरित मार्गी लावण्याचे प्रयत्न करावे. पावसामुळे येणारे पाणी वाहुन जाण्यासाठी पुर्वी सावेडी भागात मोठमोठे नाले होते. ते नाले आता पुर्वीसारखे राहिलेले नाहीत. त्या नाल्यावर अतिक्रमण झालेले आहेत. तसेच त्यांची पावसाळयापुर्वी साफसफाई केली जात नाही. त्यामुळे पाणी वाहतुकीस अडथळा होवुन पाणी साठुन राहुन घाण दुर्गंधी सुटते. व डास निर्मिती होवुन अनेक महाभयानक आजारांना तेथील नागरिकांना तोंड द्यावे लागत आहे. शहरातील घनकचरा हा वेळीच उचलला जात नाही. यासाठी खाजगी वितरकांना कचरा गोळा करण्यासाठी देणेत यावा. महानगरपालिकेने स्वत:साठी लागणारी विज तयार करण्यासाठी पवन उर्जा प्रकल्प योजनेचा पाठपुरावा करण्यात यावा. पवन उर्जा प्रकल्प लवकरात लवकर सुरू झाल्यास महावितरण कंपनीकडुन विज खरेदी करणेकामी येणा-या खर्चात कपात होईल. दलित वस्तीतील कामांना प्राधान्य द्यावे. हा विकास आराखडा तयार करतांना त्यात राजकीय हस्तक्षेप नको. मनपा कडे अभियंते कमी असल्यास आवश्यक असणारा अभियंता वर्ग त्यांनी शासनाकडुन मागवुन घ्यावा. आराखडयासाठी सर्व पक्षिय समिती स्थापन करण्यात यावी व त्यांचे मार्गदर्शन घ्यावे.

मा.सत्रे योगिता, सभापती, म.बा.क.समिती : हा शहर विकास आराखडयाचा विषय मनपा सभेत आणल्या बद्यल मी महापौर , उपमहापौर, आयुक्त यांचे अभिनंदन करते. हा विकास आराखडा तयार करतांना मी शहर अभियंता यांना सुचना केलेल्या आहेत. सर्व राजकीय पक्षांनी एकत्र येवुन या आराखडयासाठी काम करणे गरजेचे आहे. इतर महानगरपालिकांच्या मानाने आपली महानगरपालिका अतिशय मागे आहे. तांत्रिक कर्मचा-यांची संख्या अतिशय कमी आहे. तांत्रिक कर्मचारी वर्ग भरण्यासाठी परवानगी देण्यात यावी. घनकचरा उचलण्याचे काम खाजगी संस्थांना देण्यात यावे. त्या विभागाकडील कार्यरत कर्मचारी वर्ग इतर ठिकाणी वापरणेत यावा.

मा.दिपक सुळ , उपमहापौर : शहर विकासासाठी आपण जो विकास आराखडा तयार करतो आहोत त्यावर आपण फक्त चर्चा करीत आहोत. पण भविष्यात आपले नगर कसे असेल याबाबतचे प्रेझेंन्टेशन सदस्यांना दाखविण्यात यावे मग सदस्य आपल्या समस्या मांडतील.

मा.श्री.बहिरनाथ वाकळे , विरोधी पक्ष नेता : हा आराखडा तयार करत असतांना वित्त पुरवठयाबाबत काय करण्यात आले. तसेच पिंपळगांव माळवी ,वडगांव, सावेडी सरकारी विहीर , येथील जमिनीचा या आराखडयात उपयोग करण्यात यावा.

मा.नामदेव पवार : २५ वर्षा नंतरच्या रस्त्याबाबत म्हणजे रस्ते रूंदीकरण , रस्त्यांची लांबी वाढविणे बाबत काय तरतुद करण्यात आली आहे.

एन.डी.कुलकर्णी , शहर अभियंता : २५ वर्षानंतर रस्ते,ड्रेनेज, गटारी याबाबतची या आराखडयामध्ये तरतुद करण्यात आली आहे.

मा.श्री.कानडे : झोपडपट्टया बाबत काय तरतुद आहे.

मा.अभय आगरकर : स्लम एरिया घोषित करण्याचा अधिकार महानगरपालिकेस आहे काय ?

मा.लहाने, उपायुक्त : अहमदनगर शहरात २२ झोपडपट्टया आहेत. त्यात १७ झोपडपट्टया या शासन घोषित आहेत. तर ५ या अघोषित आहेत. घोषित अघोषित करण्याचा भाग आपला नाही तो शासनाचा आहे. त्या ठिकाणी ५० % पेक्षा जास्त दलित वस्ती असते. त्याठिकाणी शासन दलितवस्ती घोषित करते.

मा.श्री.कानडे : शहराचा विकास आराखडा बनवत असतांना झोपडपट्टीसाठी काय ? हद्दवाढीच्या भागातही काही झोपडपट्टया आहे. त्यांना घोषित अघोषित करण्यात आलेले नाही. पण तेथेही ५० % पेक्षा जास्त दलित वस्ती आहे. मग त्यांचे काय ? त्या झोपडपट्टयाही शहर विकास आराखडयात घ्या ?

मा.आगरकर : या आराखडयात फक्त २२ झोपडपट्टया दाखविण्यात आलेल्या आहेत. बाकी उर्वरित झोपडपट्टयांचे काय ?

मा.लहाने,उपायुक्त : हद्दवाढीतील झोपडपट्टया शहर विकास आराखडयात घेता येतील. ( शहरातील झोपडपट्टया व्यतिरिक्त )

मा.अभय आगरकर : अहमदनगर शहरातील झोपडपट्टयांचा सर्व्हे करून विषय पुढील बोर्डात घेणेत यावा.

मा.अशोक कानडे : मी स्वतः अनुसूचित जातीचा उमेदवार आहे. पण तो भाग शहर विकास आराखडयात दाखविण्यात आलेला नाही.

मा.बहिरनाथ वाकळे, विरोधी पक्ष नेता : सावेडी नाक्या समोर भिल्ल वस्ती आहे. त्यांची जागा आराखडयात दुस-या कामासाठी दर्शविण्यात आलेली आहे. शहर विकास आराखडयात त्यांची जागा संपादन केल्यानंतर त्यांचे पुनर्वसन करणार का ?

मा.लहाने,उपायुक्त : त्यांचेसाठी दुसरीकडे जागा संपादन करून पुनर्वसन करू. जागा खरेदीसाठी आराखडयात निश्चीत तरतुद करावी लागेल.

श्री.धोंगडे , नगररचनकार : आय.यु.डी.पी., यु.डी.आय.एस.एस.एम.टी. या योजनांमध्ये भुसंपादन करून पुनर्वसन करण्याची तरतुद नाही. पण स्वतंत्र व्यवस्था करावी लागेल.

मा.अशोक कानडे : शासनाच्या या योजनेची माहिती देण्यात आलेली नाही. शासनाचे मुळ परिपत्रक सभासदांना देण्यात आलेले नाही.

मा.अनंत जोशी : या योजनेचे परिपत्रक नगरसेवकांना दिलेले नाही.

मा.उडाणशिवे : रामवाडी झोपडपट्टी अघोषित का ? प्रशासनाने घोषित करण्यासाठी प्रयत्न का केले नाही ?

मा.आसाराम कावरे : अहमदनगर शहराचा चोहीबाजुने विस्तार होत असल्याने नगर शहरात चारी बाजुस चार फायर स्टेशन बनविण्यात यावेत.

मा.नामदेव पवार : एम.आय.डी.सी.चा विकास झाला तर शहराचा विकास होतो. एम.आय.डी.सी. संबंधांत या आराखडयात काय योजना आहेत. त्यांचा ही विचार केला काय ?

श्री.एन.डी.कुलकर्णी , शहर अभियंता : आपला शहराचा विकास झाला म्हणजे त्यांचा विकास होईलच.

मा.अभय आगरकर : या शहर विकास आराखडयात एम.आय.डी.सी.चा पण समावेश करण्यात आला पाहिजे.

श्री.धोंगडे, नगररचनाकार : शहर विकास आराखडयाबाबत एम.आय.डी.सी.चे संबंधित अधिका-यांशी चर्चा करण्यात आलेली आहे.

मा.अनंत जोशी : शहर विकास आराखडयातील कामासाठी आपण ११ % दराने कर्ज घेणार आहोत पण बाजारात सध्या ३ % दराने कर्ज देतात त्याचे काय ?

एन.डी.कुलकर्णी, शहर अभियंता : कमी जादा दराने कर्ज मिळते पण आपण कमीत कमी दराने कर्ज उपलब्ध करून घेवु.

मा.कृ.द.जाधव : माझ्या २ - ३ सुधारणा आहेत. शहरातील गणेश विसर्जन करण्यासाठी आराखडयात व्यवस्था करण्यात यावी. मनपाच्या शाळेच्या इमारती आहेत पण त्या इतर संस्थांना भाडयाने दिलेल्या आहेत. पटावर संख्या आहे पण प्रत्यक्षात उपस्थिती अत्यंत कमी आहे. या शाळेचाही आराखडयात विचार करण्यात यावा. तसेच मुळानगर ते नगर शहर पाणी पुरवठा प्रोजेक्ट - सध्या वांबोरी चारी चालु आहे. वांबोरी चारीवर पंप बसवुन पाणी पिंपळगांव माळवी येथे

तलावात सोडुन तेथुन आपल्या पंपाद्वारे पंपींग करून नगर शहरास पाणी पुरवठा करता येईल. पुर्वी येथुनच पाणी पुरवठा होत होता. नैसर्गिक उतार असल्याने पाणी भरपुर येईल. यात मनपाचा खर्च वाचेल. व नगर शहराचा पाणी प्रश्न सुटण्यास मदत होईल. या माझ्या सुचनांचा शहर विकास आराखडयात विचार करण्यात यावा.

मा.भगवान फुलसौंदर : गेल्या वर्षी ही योजना आपल्यापुढे आली होती. शहरातील कच-यासाठी झोनप्रमाणे कचरा डेपो तयार करावेत. वांबोरी चारी ऐवजी विसापुर तलावातुन पाणी घेण्यात यावे. त्यामुळे एम.आय.डी.सी.चा विकास होईल. मनपाचे मालकीचे विमानतळ विकसित करण्यात यावे.

मा.दिप चव्हाण : विकास आराखडयाचा विषय सभेत आणल्याबद्यल मी आभारी आहे. एखाद्या योजनेवर जेवढया निधींची तरतुद करण्यात आलेली आहे, तेवढा निधी त्या योजनेवर खर्च करण्यात यावा. निधीपेक्षा कमी खर्च करण्यात येतो. त्यामुळे कोणतीही योजना चांगल्याप्रकारे पुर्णत्वास येत नाही. घनकच-याचा प्रोजेक्ट पुर्ण करणे आवश्यक आहे. यंत्रसामुग्री देखभाल / चालविणे यासाठी कर्मचारी प्रशिक्षीत करणे आवश्यक आहे. शहरातील खड्डयासाठी आजपर्यंत १० ते १५ कोटी खर्च केले व नविन रस्त्यासाठी १० ते १५ कोटी खर्च केले आहे. मागील ५ वर्षात रस्त्यावर भरपुर खर्च झालेला आहे. शहर अभियंत्यांची संख्या कमी असल्याने त्यांच्या जागा त्वरीत भरण्यात याव्यात.हद्यवाढीत समाविष्ट झालेल्या १२ गावांमधील रस्ते सुधारणा करणे आवश्यक आहे. मागील काळात रस्तेविकास महामंडळाने शहरातील रस्ते विकास करणेबाबत योजना आणली होती तीही बारगळली. जकात ठेका दुस-या ठेकादारास का दिली नाही. महानगरपालिकेचा का तोटा केला. मनपाचे उत्पादन वाढले असते. संकलीत कर ८ कोटी , वसुली ७ कोटी तर आपण १७ कोटी कसे तयार करणार. दलित वस्तीवर २२ कोटी खर्च केलेले आहेत. आय.डी.एस.एम.टी. व इतर योजने मधील प्रोजेक्टचे काय झाले. शासनाचे प्रोजेक्ट बंद का झाले. उत्पादनाचे स्त्रोत वाढविणे आवश्यक आहे. तसेच कर्मचा-यांना दिवाळी निमित्त रू.३००० /- बोनस देण्यात यावा.

मा.अभय आगरकर : या ठिकाणी सभागृहामध्ये नगरसेवकांनी अनेक सुचना मांडल्या. समाजातील अनेक विद्वान मंडळींनी त्यांचे योगदान दिले. अनेक संस्थांशी संवाद साधले व त्यांनी ज्या सुचना मांडल्या त्या आपण यामध्ये घेतल्या. सर्वांना आपण या आराखडयात सहभागी करून घेतले पाहिजे. आराखडा तयार करतांना आपण बाहेरच्या व्यक्तिंची मते घेतो त्याप्रमाणे आपल्या कार्यालयातील त्या त्या विभागातील संबंधितांचीपण मते घ्यायला हवी. अशी मते न घेतल्यास तो

अपुर्ण आहे. सर्वांच्या अनुभवाचा फायदा घ्या. दैनंदिन कामे करतांना त्यासाठी वापरण्यात येणारा निधी इतरत्र वर्ग करण्यात येवु नये. तसेच आराखडयाची कामे करतांना दैनंदिन कामांवर दुर्लक्ष होता कामा नये. दैनंदिन उत्पन्न शहर विकास आराखडयावर वर्ग केल्यानंतर दैनंदिन कामाकरीता निधी शिल्लक राहणार का ?

मा.लहाने उपायुक्त : शहर विकास आराखडयास केंद्र शासनाची मंजुरी येईपर्यंत बराच कालावधी लागणार आहे. त्यामुळे पुढील बजेट करतांना तरतुद करावी लागेल.

मा.कृ.द.जाधव : विषय मंजुर.

**--*--**

**ठराव** : ऑफिस रिपोर्टानुसार व मा.सभेत साधक - बाधक झालेल्या चर्चेनुसार कार्यवाही करण्यास ही सभा मान्यता देत आहे. मात्र पुढील प्रमुख बाबींच्या समावेशासह विकास आराखडया बाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. खर्च मंजुर.

१. महत्वाचे रस्ते २. सावेडी भुयारी गटर योजना ३. घनकचरा व्यवस्थापन. ४. पाण्याचे टाक्या व तसेच आराखडयामध्ये प्रस्तावित रकमेच्या कामांचे सविस्तर प्रकल्प अहवाल खाजगी संस्था मार्फत जाहिर निविदा मागवुन करणेस मंजुरी देण्यात येत आहे.

आराखडयामध्ये प्रस्तावित केलेल्या कामांसाठी निधी व कर्ज उभारणेसाठी यापुढे होणारे ८ माही व वार्षिक अर्थ संकल्प व अंदाजपत्रकात तरतुद करण्यात यावी.

सन २०३१ अखेरच्या आराखडयाचे कामी खर्चास मंजुरी देण्यात येत आहे. याबाबत मा.आयुक्त मनपा यांनी योग्य ती कार्यवाही करावी. याकामी प्रतिनियुक्तीवर / मानधनावर १० कुशल अभियंते घेण्यास मंजुरी देण्यात येत आहे. तसेच मा.शासनाकडुन अभियंते उपलब्ध होईपर्यंत सदरच्या विकास आराखडयाचे काम थांबवु नये यास्तव तात्पुर्त्या स्वरूपाच्या नेमणुकीवर अभियंते नेमण्याबाबत आवश्यकतेनुसार उचित कार्यवाही करण्यात यावी.

शहराची वाढीव हद्द लक्षात घेवुन श्री.गणेशमुर्ती विसर्जन करण्याकरीता आराखडयामध्ये योग्य ते नियोजन करण्यात यावे.

मनपा हद्दीतील घोषित अघोषित २२ झोपडपट्टयासह ५० % पेक्षा अधिक दलित वस्ती असणा-या भागांचा अभ्यास करून सदरच्या आराखडयामध्ये अशा भागाच्या सुविधेकरीता समावेश करण्यात यावा.

वांबोरी चारीला नैसर्गिक उतार असल्यामुळे वांबोरी चारीवर पंप बसवुन पाणी पिंपळगांव माळवी येथील तलावात सोडुन पंपाद्वारे पंपिंग करून नगर शहरास पाणी पुरवठा होईल या सुचनेचा तसेच विसापुर तलावातील पाणी महानगरपालिकेस उपयोगात आणणे या दोनही सुचित केलेल्या बाबींचा तांत्रिकदृष्टया अभ्यास करून त्यानंतरच सदर बाबत पुढील उचित कार्यवाही करण्यात यावी.

सुचक : मा.श्री.कृ.द.जाधव.

अनुमोदक : मा.सौ.योगिता सत्रे.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.